प्रेषक

कार्यवाह,

## महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**म. से. संघ मार्ग व**

**पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग,**

**मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०**

दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५

e-mail: mss_mulund@rediffmail.com

Web Site: www.mahasevasangh.org

संकल्पना : जयप्रकाश बर्वे, रचना : प्र.र. सोमे, छपाई : साक्षी

रजि.क्र. एफ४०२० स्थापना १९३७

॥ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड




## वार्षिक अहवाल
## २०२१-२२




सुधाकर अुद्धवराव आठले समाजोद्धारक पुरस्कार



गिरिमित्र - किल्ले बांधणी स्पर्धा पुरस्कार प्रदान सोहळा



अर्थ विभाग - सद्य स्थितीत गुंतवणुकीच्या संधी



सा.स.न.चिं.केळकर ग्रंथालय - व्यासपूजन



विद्याझंकार कला विभाग - चित्रपट रसग्रहण




मैत्रेयी - स्त्रिया आणि महासाथ



ऐरोली शाखा अभ्यासिका - ७५ कोटी सूर्यनमस्कार अभियान



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅन्ड अॅग्रिकल्चर -सेमिनार ऑन इंस्टिट्यूशनल आर्बिट्रेशन



ऐरोली शाखा - रांगोळी प्रशिक्षण कार्यशाळा



ऐरोली शाखा - गणपती मूर्ती निर्माण कार्यशाळा



ऐरोली शाखा - सुवाच्य अक्षर कार्यशाळा




ऐरोली शाखा - दिवाळी पहाट

।।श्री।।

*नमस्कार,*

*सन २०२१-२२ चा अहवाल सादर करताना वेगवेगळ्या भावनांचा कल्लोळ सारे मन व्यापून राहिला आहे. अकल्पितपणे घटनेतील तरतुदीमुळे संस्थेचे अध्यक्षपद मला मिळाल्याने आनंद आहे, त्याचबरोबर संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर कुलकर्णी यांच्या अकाली, अकस्मिक निधनामुळे अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारावी लागली याची खंतही आहे. मागील पूर्ण वर्ष करोनाच्या दहशतीखालीच होते. याच कालावधीत संस्थेचे काही कर्मचारी व सभासद गमवावे लागल्याचेही दुःख आहे. करोना महामारीची दहशत व त्या अनुषंगाने लादलेली सरकारी बंधने यांनी संस्थेचे उत्पन्नाचे स्रोत , सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम, कार्ये, समारंभ इतकेच नव्हे तर कार्यकर्ते/ पदाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट हे सर्व पूर्णतः झाकोळून गेले होते.*

*आरोग्यविषयक सर्व सरकारी बंधने पाळून प्रथमतः आभासी स्वरूपात व कालांतराने मर्यादित संख्येतील श्रोत्यांच्या उपस्थितीत वेगवेगळी व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, अर्थ-प्रबोधनपर व्याख्याने/शिबिरे यांचे आयोजन जसे शक्य झाले तसे आयोजित करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान संस्थेची सुनसान सभागृहे, कार्यक्रमाच्या आयोजनातील उणिवा, गांभीर्य, लोकांपर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचविण्यातील अडचणी यांची करून देत असलेली आठवण क्लेशदायी असे, परंतु याबाबत सकारात्मक कांही करणे त्यावेळच्या परिस्थितीमुळे केवळ अशक्यच होते. मार्च २०२२ अखेरीस बरीचशी सरकारी बंधने शिथिल करण्यात आली.कार्यक्रमांमधील जन-सहभागासंबंधीची बंधने उठल्याने , कार्यकर्त्यांनी पुन्हा नव्या उत्साहाने विविध कार्यक्रम आयोजित करणे सुरू केले व पूर्वीप्रमाणेच गजबजलेली सभागृहे पुनश्च पाहता येऊ लागली. संस्था कार्यरत झाली या अत्यंत सुखावणाऱ्या गोष्टी वाटतात.*

*संस्थेचा 'दृष्टिसेवा' उपक्रम या कठीण परिस्थितीतही आभासी किंवा प्रत्यक्ष व्यवस्थित चालू ठेवता आला व त्याचे श्रेय सर्व विद्यार्थी, शिक्षक, लेखनिक व कर्मचारी तसेच कार्यकर्ते या सर्वांनाच द्यायला हवे.या सर्वांच्या निश्चयालाही दाद द्यायला हवी. यंदासुद्धा शालांत परीक्षेला २४ विद्यार्थी परिश्रमपूर्वक तयारी करून बसविता आले व नेहमीप्रमाणेच १००टक्के निकाल लागला आहे.*

*मागील अहवालात मुलुंड विद्याझंकार या संस्थेचे आपल्या संस्थेत विलीनीकरण होत असल्याचा उल्लेख केलेला आहे, परंतु अनेक तांत्रिक, शासकीय अडचणींमुळे विलीनीकरणाची प्रक्रिया स्थगित किंबहुना रहित करण्यात आली आहे. त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात लेखी निवेदन दिलेले आहे.*

*मध्यंतरीच्या काळात संस्थेचे उत्पन्न लक्षणीयारीत्या घटल्याने कार्यक्रमांची संख्या जरी मर्यादित झालेली असली तरी कर्मचाऱ्यांचे वेतन, व्यवस्थापन, इमारतीची देखभाल इ. खर्च केवळ अटळच असतात व त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असणे आवश्यक ठरते ाणि या भूमिकेतून आम्ही सर्व सदस्यांना पुनरपि आवाहन करतो की सर्वांनी तन-मन-धनाने संस्थेच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणे ही काळाची गरज ठरते हे ओळखून सर्वांनी यथाशक्ती आपला सहभाग द्यावा अर्थात् कोणत्याही प्रकारची सक्ती नाहीच, केवळ प्रेमभाव वृद्धीच्या निकोप भावनेतून ही प्रक्रिया पार पडावी अशी प्रामाणिक इच्छा व अपेक्षा आहे.*

*सुमारे आठ महिन्यांच्या माझ्या छोटेखानी अध्यक्षीय कारकिर्दीत मला सर्वांनी दिलेल्या पाठिंबा व सहकार्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे.*

*धन्यवाद!*

*... विनोद सौदागर,*

*अध्यक्ष.*



Ahval text2122N.indd 1 7/23/2022 8:34:57 AM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

## विश्वस्त मंडळ

श्री.चंद्रशेखर म.कुलकर्णी (२७ नोव्हेंबर २०२१पर्यंत)
श्री. चंद्रशेखर ना वझे
डॉ. आनंद रा. कट्टी
श्री.अजित ग. करंदीकर
श्री. उल्हास कृ. हंबर्डे
श्री. रमेश दे. धामणकर
श्री. किरण रा. देशमुख

## कार्यकारी मंडळ

### पदाधिकारी

श्री.चंद्रशेखर म.कुलकर्णी (२७ नोव्हेंबर २०२१पर्यंत)
श्री.विनोद म. सौदागर (अध्यक्ष -२८ नोव्हेंबर २०२१पासून)
श्री.जयप्रकाश र. बर्वे - कार्यवाह
श्री. अवधूत पं. गोळे - सहकार्यवाह
श्री. प्रकाश ह. सडेकर-कोषाध्यक्ष
श्री.धनंजय दि. दिवेकर- सहकोषाध्यक्ष

### सदस्य

श्री.प्रदीप र. सप्रे
श्री. विजय वा. वझे
श्री. शंकर गो. वीरकर
श्री. नितीन देशपांडे
(स्वीकृत ०८.०८.२०२१ पासून)
श्री. पंकज पाठक
(स्वीकृत ०८.०८.२०२१ पासून)
श्री.विनायक ज. जोगळेकर
श्री. सतीश श्री. पाटणकर
श्री. किशोर पेंढरकर
(स्वीकृत ०८.०८.२०२१ पासून)
श्रीमती नंदिनी हंबर्डे
(स्वीकृत ०८.०८.२०२१ पासून)

## ऐरोली व्यवस्थापन समिती

श्री. प्रदीप र. सप्रे - अध्यक्ष
श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह
श्री. किशोर पेंढरकर -कोषाध्यक्ष
श्री. विनोद सौदागर (पदसिद्ध)
श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

## मानद अंतर्गत हिशेब तपासनीस

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्री. घनश्याम बा. कवठणकर(ऐरोलीसाठी)

## हिशेब तपासनीस

मेसर्स सिंगवी, ओतुरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)



Ahval text2122N.indd 2 7/23/2022 8:35:20 AM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब : व्यवस्थापक
श्रीमती सुमिता पवार

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. श्रीरंग भाष्टे
श्री. भास्कर इंगळे
श्री. दिनेश रसाळ

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती श्रद्धा गोविलकर - ग्रंथपाल
श्रीमती आरती रणदिवे
श्री. योगेश मोडक

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर (२७.०९.२०२१पर्यंत)
श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती प्रियांका शाळीग्राम (व्यवस्थापक)
श्रीमती केतकी जाधव
श्रीमती रेणुका गोखले

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. शंकर शिंगोटे
श्री. सुरेंद्र राणे
श्री. शिवाजी पिसाळ
श्री. राऊत

---

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**
म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०
दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५
e-mail: mss_mulund@rediffmail.com
Web Site: www.mahasevasangh.org

**ऐरोली शाखा**
म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,
ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८
दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६
e-mail : mss.airoli@rediffmail.com



Ahval text2122N.indd 3 7/23/2022 8:35:20 AM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)
मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२) रविवार, दि. ०७ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील कामे

१. दि. ०८.०८.२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०२१-२२ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०२१-२२ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०२२-२३ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०२२-२३ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०२२-२३ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १८(९) व १९(१) नुसार कार्यकारी मंडळातून स्व. चंद्रशेखर कुलकर्णी यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षांची जागा भरणे.
९. घटना कलम १३(२) नुसार विश्वस्त मंडळातून निवृत्त होणाऱ्या १ सदस्याची जागा भरणे.
१०. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ५ सदस्यांच्या जागा भरणे.
११. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
१२. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

### विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. २६ जुलै ते बुधवार, दि.०४ ऑगस्ट२०२२ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.०३ ऑगस्ट २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. विश्वस्त मंडळावरून डॉ.आनंद रा.कट्टी निवृत्त होत आहेत. तसेच कार्यकारी मंडळातून सर्वश्री प्र.र. सप्रे, प्र.ह. सडेकर , अ.पं. गोळे, शं.गो.वीरकर, विनायक जोगळेकर निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.



Ahval text2122N.indd 4 7/23/2022 8:35:20 AM

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री प्रदीप नाटेकर, मधुसूदन बर्वे व श्रीमती सुमेधा नवाथे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. प्रदीप नाटेकर निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. अध्यक्ष, विश्वस्त मंडळातील १, तसेच कार्यकारी मंडळातील ५ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.०७ ऑगस्ट २०२२ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०२१ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल.(सभासद क्र. आजीव ९८७ पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २५ जुलै २०२२ ते ०२ ऑगस्ट २०२२ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.०२ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ०३ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ०४ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि.०४ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.०५ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १९ जुलै २०२२

जयप्रकाश बर्वे
(कार्यवाह)

**टीप :**

- या वर्षी सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत घरी न पाठवता, अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय संस्थेच्या कार्यकारिणी ने घेतला आहे.
- या निर्णयानुसार सभासदांना अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या mahasevasangh.org , या संकेत स्थळावर दि.२४.०७.२०२२ पासून उपलब्ध होईल.
- ज्या सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत हवी असेल, त्यांना ती दि.२५.०७.२०२२ पासून संस्थेच्या मुलुंड कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.
- वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी देखील अहवालाच्या मुद्रित प्रती सभेला उपस्थित राहाणाऱ्या सभासदांना उपलब्ध करून देण्यात येतील.
- सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.

**ऋणनिर्देश** : मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी.बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; स्टेट बँक ऑफ इंडिया, अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंदासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, श्री. सतीश कामत , श्री. राजाराम नाटेकर, वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कंपनी, मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी व श्री. घनश्याम बा. कवठणकर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. पराग करंदीकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, वैभव वझे, 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे, (कार्यवाह)

विनोद सौदागर ,(अध्यक्ष) (२८नोव्हेंबर२०२१पासून)

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा ➔** | **२** | **७** | **५** |
| १ | श्री.चं.म.कुलकर्णी | २ | ४ | ४ |
| २ | श्री. चं.ना.वझे | २ | ६ | |
| ३ | श्री.आ.रा. कट्टी | २ | ४ | |
| ४ | श्री.र.दे. धामणकर | २ | ५ | |
| ५ | श्री.अ.ग. करंदीकर | २ | १ | |
| ६ | श्री. उ.कृ.हंबर्डे | २ | २ | |
| ७ | श्री. कि.रा. देशमुख | २ | ६ | |
| ८ | श्री.ज.र.बर्वे | | ६ | ५ |
| ९ | श्री.ध.दि.दिवेकर | | ६ | ३ |
| १० | श्री.वि.म. सौदागर | | ७ | ५ |
| ११ | श्री. प्र.र. सप्रे | | ५ | ४ |
| १२ | श्री.वि.ज.जोगळेकर | | ४ | ३ |
| १३ | श्री.वि.वा.वझे | | ३ | २ |
| १४ | श्री.स.श्री.पाटणकर | | ७ | ३ |
| १५ | श्री. अ.पं. गोळे | | ७ | ४ |
| १६ | श्री.प्र.ह.सडेकर | | ६ | ३ |
| १७ | श्री.शं.गो.वीरकर | | ७ | ४ |
| १८ | श्री. नितीन देशपांडे | | ४ | ४ |
| १९ | श्रीमती नंदिनी हंबर्डे | | ५ | ५ |
| २० | श्री.किशोर म. पेंढरकर | | २ | ३ |
| २१ | महेंद्र तेरेदेसाई | | ३ | ३ |
| २२ | गुरुप्रसाद कार्लेकर | | ४ | ३ |
| २३ | पंकज पाठक | | ३ | ३ |
| २४ | राहुल मेश्राम | | ४ | २ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च२१अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च २२ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | १३ | – | २ | ११ |
| आधारस्तंभ | १३ | – | - | १३ |
| आश्रयदाते | ५ | – | – | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | | | | |
| आजीव | ९७८ | ७ | - | ९८५ |
| **एकूण** | **१००९** | **७** | **२** | **१०१४** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे ११, ऐरोली येथे -७ , ग्रीन सभासद- १०२ /**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम -

**मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | १४पू | २० स<br>०६ सायं<br>०९ संस्था कार्यक्रम | | १पू<br>२३ स<br>१२ सायं.<br>१२ संस्था कार्यक्रम |

**ऐरोली वास्तू -**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ वातानुकूलित | सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ३पू/१० स. | २ स | | ३पू/१२ स. |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली :**

संस्थेचे अध्यक्ष आणि सर्वांचे लाडके श्री. चंद्रशेखर म. कुलकर्णी यांचे दि.२७ नोव्हेंबर २०२१ रोजी संस्थेच्या कार्यक्रमात प्रास्ताविक करत असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. गेली जवळजवळ २५ वर्षे श्री.चंद्रशेखर कुलकर्णी यांनी संस्थेच्या विविध पदांवर कार्य केले. संस्थेविषयी आत्मीयता असलेला एक उत्तम कार्यकर्ता संस्थेने गमावला. संस्थेच्या कार्यकारी मंडळात काम करत असताना त्यांनी अनेक उपक्रमांत आपल्या कार्याचा ठसा उमटवला. संस्थेची घटना, संस्कृत विभाग, या विभागांसाठी त्यांनी उत्तम काम केले. तसेच कार्यवाह पदी असताना ऐरोली शाखेच्या उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता, संस्थेच्या विविध पुरस्कारांसाठी नावांची निवड करणे, संस्थेच्या हीरक महोत्सवासाठी तर त्यांनी अविरत काम केले. संस्थेची माहिती देणारी सीडी बनवणे, स्मरणिका बनवणे तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अविश्रांत मेहनत घेऊन विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे, छायाचित्र प्रदर्शन आयोजित करणे यासाठीची मेहनत संस्थेच्या इतिहासात नोंद घेतली जाण्याच्या योग्यतेचीच होती. त्यांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!!



**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या**

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **गिरिमित्र विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| | | ४,००० |
| | | |
| **आपुलकी अंकासाठी** | | |
| १ | स्पार्क इलेक्ट्रोसिस्टिम्स (किरण देशमुख) | ६,००० |
| | | |
| **आरोग्य विभागासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | ज्युपिटर बायोलॅब्स प्रा.लि. | १,००,००० |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती नंदिनी उल्हास हंबर्डे | ११,००० |
| २ | श्री.अजित नागपूरकर | ५,००० |
| ३ | श्री. श्रीधर त्र्यंबक कुंटे | ५,००० |
| ४ | श्री. मंदार गोखले | ५,००० |
| ५ | श्री. संदीप भांडारकर | ५,००० |
| ६ | इतर देणग्या | २,६४,५५२ |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | २५,००० |
| २ | श्री. अरुण भंडारे | ११,००० |
| ३ | श्री. पांडुरंग द्वारकानाथ कुलकर्णी | ५,००१ |
| ४ | इतर देणग्या | ३,००० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री अजय दत्तात्रय वाळिंबे | ५०,००० |
| २ | श्री.प्रभाकर श्रीपाद कराडकर | १५,००० |
| ३ | सी.ए.चंद्रशेखर ना. वझे | १०,००० |
| ४ | श्रीमती कुंदा जयंत वैद्य | ५,००० |
| ५ | श्रीमती लीला गोखले | ५,००० |
| ६ | श्रीमती मृदुला दंड | ५,००० |
| ७ | श्रीमती शुभदा रमेश शेठ | ५,००० |
| ८ | इतर देणग्या | १२,००१ |
| | | |
| | | |



Ahval text2122N.indd 8 7/23/2022 8:35:20 AM

| | | |
|---|---|---|
| **मैत्रेयी विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री समीर कर्वे | १०,००० |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| | | २,२०० |
| **सॅल्यूट इंडिया (वीर शक्ती) विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सुहास सदाशिव सहस्त्रबुद्धे | ३०,००० |
| **विद्याझंकार कला विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| | | ४,००० |

**संस्थेने दिलेल्या देणग्या**

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था | ५,००० |
| २ | आचार्य अत्रे समिती, मुलुंड (पूर्व) | ५,००० |
| ३ | नववर्ष यात्रा समिती, मुलुंड (पूर्व) | ५,००० |

**महाराष्ट्र सेवा संघाचे कार्यक्रम**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट २०२२ | झेंडा वंदन | |
| २ | २१ऑगस्ट २०२१ | सुधाकर अुद्धवराव आठले समाजोद्धारक पुरस्कार | प्रमुख पाहुणे : खासदार श्री. विनय सहस्त्रबुद्धे |

**श्रद्धांजली :**

अभिनेता दिलीपकुमार, प्रख्यात कवी, संवादक सतीश काळसेकर, ज्येष्ठ साहित्यिक अनंत मनोहर, अभिनेते अनुपम श्याम, आयुर्वेदाचार्य बालाजी तांबे, ज्येष्ठ गायिका जगजित कौर (संगीतकार खय्याम यांच्या पत्नी), ज्येष्ठ लेखक आणि नाटककार जयंत पवार, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, मेहता पब्लिशिंगचे सुनिल मेहता, लेखक संपादक अरुण जाखडे, सुप्रसिद्ध कथक कलाकार पद्मभूषण बिरजू महाराज, ज्येष्ठ लेखक, साहित्यिक आणि समाजसेवक डॉ.अनिल अवचट, (त्यांच्या 'मुक्तांगण' या संस्थेला सु.ल. गद्रे सामाजिक संस्था पुरस्कार देण्यात आला होता.)भारत रत्न गानकोकिळा लता मंगेशकर तसेच ज्येष्ठ अभिनेत्री प्रेमा किरण यांचे अहवालवर्षी देहावसान झाले. या सर्वांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!!

महाराष्ट्र सेवा संघाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, मैत्रेयी महिला शाखेच्या तसेच न.चिं केळकर ग्रंथालयाच्या माजी अध्यक्षा व 'आपुलकी'च्या कार्यकारी संपादक सुषमा पाटणकर (आजीव४५०), माजी विश्वस्त चंद्रकांत दि.खरे (आजीव४९३) तसेच संस्थेचे सेवक प्रदीप वाईकर यांचे अहवाल वर्षात निधन झाले. त्यांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!



Ahval text2122N.indd 9 7/23/2022 8:35:20 AM

# संस्कृत विभाग

अध्यक्ष - गुरुप्रसाद कार्लेकर, कार्यवाह - सुमेधा नवाथे
सभासद : चंद्रशेखर वझे, भावना दांडेकर, वरदा नवाथे, निधी कार्लेकर, प्रसाद भिडे, जयप्रकाश बर्वे, वि.म.सौदागर

दि. ७ ऑगस्ट २०२१ रोजी महाराष्ट्र सेवा संघाने २०२०च्या राज्य नाट्यस्पर्धेत सादर केलेल्या पं. प्रभाकर भातखंडे लिखित 'विद्या तु भस्मसात् भूता। ' या नाटकाचे विडिओ शूटिंग करण्यात आले.

संगीत नाटक अकादमी साठी 'रूपांगण फाऊंडेशन,चेंबूर' या संस्थेतर्फे द्विभाषिक नाट्य महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवात दि.१० ऑक्टोबर रोजी आपल्या नाटकाचा प्रयोग ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात आला.

हेच नाटक दि. १६ जानेवारी २०२२ रोजी सोमय्या विद्याविहार विश्वविद्यालयाच्या ३३ व्या ज्ञानयज्ञामध्ये ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात आले. या नाटकाचे रसिकांकडून खूपच कौतुक झाले. या नाटकाचे दिग्दर्शन तक्षील खानविलकर यांनी केले होते.

६०व्या संस्कृत राज्य नाट्य स्पर्धेत 'देवादपि गरीयसी' हे नाटक सादर करण्यात आले. ह्या नाटकाला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक जाहीर झाले तसेच पं. प्रभाकर भातखंडे यांना लेखनाचे प्रथम पारितोषिक जाहीर झाले.

गेली दोन वर्षे स्थगित असलेला संस्कृत रसास्वाद वर्ग दि. ३१ मार्च २०२२ पासून पुन्हा सुरू झाला. ब्रह्मसूत्रांचा अभ्यास करण्यात येत आहे.

सुमेधा नवाथे (कार्यवाह) गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष)

# आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, विनायक जोगळेकर - कार्यवाह
सदस्य : अ. मो. भंडारे, प्रकाश सडेकर, वि. म. सौदागर, वि. सं. जोशी, पंकज पाठक, डॉ.नितीन पाटणकर

मागील अहवालात नमूद केल्याप्रमाणे आरोग्य विभागाने शरीर स्वास्थ्यावर भर देण्याचे ठरविले आहे. आपल्या सर्व सभासदांमध्ये किंबहुना मुलुंडमधील ज्येष्ठ नागरिकांमध्ये मानवी शरीराची रचना , त्यातील प्रमुख अवयव व त्यांचे कार्य, त्यांना अनुलक्षून होणारे जीवघेणे आजार, त्यांची लक्षणे, त्यावरील उपायांबाबत जागृती निर्माण करणे आवश्यक वाटल्याने प्रबोधनात्मक, लोकशिक्षणात्मक व्याख्याने /उपक्रमांचे आयोजन आरोग्य विभागाने केले व त्याला मुलुंडकरांचा उत्तम प्रतिसाद लाभला. त्यामुळे कार्यकर्त्यांचा हुरूप वाढला. व भविष्यातही अशाच कार्यक्रमांचे आयोजन करावे असे कार्यकर्त्यांना वाटले.

या वर्षी संस्थेच्या आरोग्य विभाग व 'ज्युपिटर बायोलॅब्स प्रा.लि.' या कंपनीच्या संयुक्त विद्यमाने २०२२-२३ या वर्षभरात दरमहा आजारविषयक व्याख्यान व त्या रोगासंबंधी शिबिर घेण्याचे नियोजन केलेले आहे. या कार्यक्रमासाठी आपले बहुमोल सहकार्य लाभेल अशी आशा व्यक्त करतो. या कार्यक्रमाच्या आयोजनात आमचे सभासद डॉ.नितीन पाटणकर यांचे बहुमूल्य मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे. 'ज्युपिटर बायोलॅब्स प्रा.लि.' या संस्थेचे श्री.अनिल पाटकर यांच्या वतीने बहुमोल आर्थिक योगदान मिळाले आहे व यापुढेही मिळत राहील अशी आशा आहे.

'बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन' च्या सहकार्याने मुलुंड येथील दवाखाना व भौतिक उपचार केंद्र उत्तम लोकाश्रयामुळे सुरू आहे. आसपासच्या परिसरातील जनतेचा वाढता प्रतिसाद अनुभवास येतो. लोकोपयोगी, किफायतशीर अशा गरजेनुरूप नवनवीन सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न कायमच करण्यात येतो. बी.एम.ए.एफ.च्या पदाधिकाऱ्यांचा सक्रिय पाठिंबाही मिळत असतो.

विनायक जोगळेकर , कार्यवाह र.दे धामणकर, अध्यक्ष



Ahval text2122N.indd 10 7/23/2022 8:35:20 AM

# आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - अरुण भंडारे, संपादन साहाय्य : विनोद सौदागर, सुषमा पाटणकर, नंदिनी हंबर्डे

या अहवाल वर्षात 'आपुलकी'चे २ अंक जून आणि डिसेंबर महिन्यात प्रकाशित केले. 'आपुलकी'चे त्रैमासिकातून षाण्मासिकात आपण रूपांतर केले आहे.
जून २०२१ च्या अंकासाठी म.टा. चे ज्येष्ठ पत्रकार समीर कर्वे तसेच मुकुंद कुळे यांचे लेख आपण मिळवू शकलो तसेच या अंकात अरुण भंडारे, योगिनी पाळंदे, श्रद्धा सांगळे व प्रदीप सप्रे यांचेही लेख होते.
डिसेंबर २०२१ च्या अंकात ग्रंथालयाने आयोजित केलेल्या आणि उदंड प्रतिसाद लाभलेल्या 'मला काय वाटते' या लेखन स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या लेखांचा अंतर्भाव होता. या व्यतिरिक्त डॉ.मनीषा बर्वे, विजय पंडित, उमा केतकर व माधवी देशमुख यांचे लेख होते.
दोन्ही अंक देखणे होते. 'आपुलकी'चे फलित काय तर या षाण्मासिकाने मुलुंडमधील सेवा संघाशी जोडले गेलेल्या अनेकांना लिहिते केले आहे.

...अरुण भंडारे,
कार्यकारी संपादक, आपुलकी

# मैत्रेयी- महिला विभाग

प्रियांका मोकाशी (अध्यक्ष) , नंदिनी हंबर्डे (कार्यवाह)
सदस्य : सुषमा पाटणकर, वासंती वैद्य , माधवी भुसारी, मेधा देव, वीणा नाटेकर, मीना वीरकर, मेधा देव

मैत्रेयी आणि सा.स.न.चिं. केळकर ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने जुलै महिन्यामध्ये 'मला काय वाटतं?' या लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला आमच्या अपेक्षेपेक्षा जास्त चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच परदेशातूनही आजच्या तरुणाईपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी आपले विचार मांडले. एकूण ५०स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला.
स्पर्धेचे विषय असे होते.
१. वाढतं आयुर्मान लाभदायक की तापदायक?
२. दृकश्राव्य माध्यमातली स्त्री प्रतिमा बदलते आहे का?
३. अगं अगं लशी
४. गीतकार शांताबाई शेळके
५.पर्यावरणाशी माझं नातं
६. माझा सोशल मिडिया माझी जबाबदारी
स्पर्धेचे परीक्षक होते : १)अस्मिता मोहिते - पॉप्युलर प्रकाशनच्या बिझिनेस डेव्हलपमेंट हेड, २) मृण्मयी रानडे - मान्यवर पत्रकार
१७ ऑगस्ट २०२१ ला आपण या स्पर्धेचा निकाल जाहीर केला आणि ४ सप्टेंबर २०२१ ला आपण बक्षीस वितरण समारंभ केला.
स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे :
पहिले बक्षीस - रेखा नाबर , दुसरे बक्षीस - रुची दळी, तिसरे बक्षीस - प्रीती ठाकूर, तिसरे बक्षीस- शालिनी ताम्हणकर, चौथे बक्षीस - संध्या यादवाडकर, चौथे बक्षीस- जान्हवी गांगल, पाचवे बक्षीस - सागर साबडे
या स्पर्धेच्या विजयी स्पर्धकांसाठी बक्षीसांची रक्कम पुरस्कृत केली मान्यवर पत्रकार समीर कर्वे आणि त्यांच्या कुटुंबियांनी. कर्वे कुटुंबियांचे विशेष आभार!



Ahval text2122N.indd 11 7/23/2022 8:35:20 AM

कोविड१९ च्या पार्श्वभूमीवर मैत्रेयीने काही कार्यक्रम 'ऑनलाईन' पद्धतीने सादर केले.
२७ ऑगस्ट २०२१ : रानभाज्या व जादुई भरड धान्ये (मिलेट्स) एक पोषक परिपूर्ण आहार' सादरकर्त्या श्रीमती नीलिमा जोरवर.
५ऑक्टोबर २०२१ : 'प्रवास प्रकाश(न) वाटेवरचा'. मुलाखत देवयानी कुलकर्णी अभ्यंकर, संचालिका 'कॉन्टिनेंटल प्रकाशन'; मुलाखतकार होत्या श्रीमती अस्मिता मोहिते, संपादिका - पॉप्युलर प्रकाशन
२८ऑक्टोबर २०२१: 'कोजागिरी पौर्णिमा' मैत्रेयीने गप्पा, गाणी, गोष्टी व विविध खेळ घेऊन साजरी केली. सहभाग होता मैत्रेयी सभासद व मैत्रिणी.
१५ मार्च २०२२: आंतरराष्ट्रीय महिला दिन - या निमित्त खास माहितीपर भाषण ठेवण्यात आले होते. विषय होता,'स्त्रिया आणि महासाथ'. श्रीमती अमोल केरकर (विश्वस्त - स्त्री मुक्ती संघटना) यांनी सुंदर विचार मांडले.
१२ एप्रिल २०२२ : मैत्रेयी व कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने वासंतिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. 'लता वेलू गेला गगनावरी' गान सम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हिंदी व मराठी गाण्यावर कार्यक्रम सादर केला वीणा शुक्ल आणि त्यांच्या शिष्या यांनी. या कार्यक्रमाचा आनंद साऱ्यांनी घेतला.
याही वर्षी मैत्रेयी नेहमीप्रमाणेच दर्जेदार कार्यक्रम देण्याचा प्रयत्न करेल.

धन्यवाद !

नंदिनी हंबर्डे (कार्यवाह) प्रियांका मोकाशी (अध्यक्ष) ११ फेब्रुवारी २०२२ पर्यंत

## विद्याझंकार कला विभाग

**अध्यक्ष - महेंद्र तेरेदेसाई, कार्यवाह : वैदेही फडणीस**
**सदस्य : मुग्धा गोळे, मोहित वैद्य, शशांक किणी, कविता नाईक**

**२०२० मार्चपासून सुरू झालेल्या कोविड १९ महामारीचा प्रभाव कमी होत असतानाच २०२१ च्या फेब्रुवारीमध्ये या महामारीची दुसरी लाट आली आणि पुन्हा एकदा जग अनिश्चिततेकडे लोटले गेले. अशा परिस्थितीत देखील विद्या झंकार कलाविभागाने सातत्यपूर्ण कार्यक्रम सादर करण्याचा प्रयत्न यावर्षी केला. ह्या वर्षात सादर झालेल्या कार्यक्रमांची यादी खालीलप्रमाणे,**

**दि.२५ सप्टेंबर २०२१ : 'आई कुठे काय करते ?' या मालिकेच्या लेखिका मुग्धा गोडबोले व नमिता वर्तक यांच्याशी संवाद**
**दि.२३ ऑक्टोबर २०२१ : सुप्रसिद्ध पत्रकार, लेखक व वक्ते भाऊ तोरसेकर यांचे व्याख्यान.**
**दि.१९ नोव्हेंबर २०२१ : ऑक्टोबर महिन्यात घेण्यात आलेल्या एकांकिका लेखन स्पर्धेचा बक्षीस समारंभ**
**६ फेब्रुवारी २०२२ : श्री. अशोक राणे व महेंद्र तेरेदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'चित्रपट रसग्रहण कार्यशाळा'**
**५ मार्च २०२२ : डॉ.सुरेश चांदवणकर यांनी सादर केलेला अक्षय गाणी, अखंड गाणी व आठवणी या स्वर्गीय गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना श्रद्धांजली देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन.**

**कलाविभागाने ह्या वर्षी सादर केलेल्या सर्व कार्यक्रमांतून वैविध्यपूर्ण विषय हाताळण्याचा व सादर करण्याचा प्रयत्न केला. तरुणांचा सहभाग जास्तीत जास्त वाढावा या उद्देशाने कार्यक्रम सादरीकरण्याच्या आधुनिक पद्धती, तसेच आधुनिक व वैविध्यपूर्ण विचारांची मांडणी आपल्या कार्यक्रमांतून केली. एकांकिका लेखन स्पर्धेच्या माध्यमातून प्रत्येक वयोगटातील लेखकाला आपली गोष्ट, विचार मांडता आले. विविध मान्यवर आणि अनुभवी लेखकांच्या मुलाखतींमधून विचारांची देवाण घेवाण झाली. चित्रपट पाहतांना प्रेक्षकाला रसानुभूतीचा आनंद मिळावा या उद्देशाने चित्रपट कसा पाहावा ? ह्याचे बारकावे शिकवणाऱ्या चित्रपट रसग्रहण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**



Ahval text2122N.indd 12 7/23/2022 8:35:21 AM

मुंबई प्रत्येकाला आपल्या नजरेतून वेगवेगळी दिसते. अशा मुंबईचे दर्शन घडवणारा 'दास्तान - ए - बड़ी बांका' हा प्रयोग अथवा एकत्र बसून चित्रपट पाहाणे व त्यानंतर समीक्षक व रसिक प्रेक्षक यांच्या चर्चा, टिपण्णी यातून एक वेगळी दृष्टी देणाऱ्या 'सिनेमा ऑन बेंच' सारख्या उपक्रमाच्या पहिल्याच भेटीत २८ सहभागी प्रेक्षक नोंदणी ही विद्याझंकार कलाविभागाच्या पुढील वर्षीच्या यशस्वी वाटचालीचे आश्वासन देते. पुढील वर्षात असेच अनेक दर्जेदार कार्यक्रम विभागातर्फे सादर करण्याचा प्रयत्न अविरत सुरूच राहील.

वैदेही फडणीस
कार्यवाह

महेंद्र तेरेदेसाई
अध्यक्ष

# गिरिमित्र विभाग



अध्यक्ष : हृषीकेश यादव, उपाध्यक्ष : ॲड. रवी परांजपे, कार्यवाह : किरण देशमुख
सभासद : राहुल मेश्राम, प्रसाद जोशी, रमेश कुलकर्णी व श्रीमती अपर्णा भट्टे

गिरिमित्र विभागाचा २०२१-२२ चा अहवाल संमिश्र भावनेने सादर करण्यात येत आहे. विभागाचे आधारस्तंभ कै. र.द लाड यांच्या अकस्मिक निधनामुळे बसलेल्या धक्क्यातून सावरतानाच कोविड १९ च्या परिणामांनाही सामोरे जावे लागले. त्यामुळे या अहवाल वर्षात देखील संमेलन होऊ शकले नाही.

अशा परिस्थितीत देखील कार्यकर्त्यांनी धीर न सोडता शक्य तेवढे कार्य सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याचा एक भाग म्हणजे महाड, पोलादपूर, चिपळूण आणि सांगली या भागांत महापुरामुळे निर्माण झालेल्या आपत्तीदरम्यान 'अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ' यांचेतर्फे सुरू असलेल्या 'रेस्क्यू, रिलिफ आणि पुनर्वसन' कार्यात आपल्या विभागाचे कार्यकर्ते देखील विविध आघाड्यांवर कार्यरत होते. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धान्य, कपडालत्ता, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंची जमवाजमव करून हे सर्व सामान सेवा संघाच्या सभागृहात एकत्र करण्यात आले. १०००किलो (एक टन) धान्य, व जीवनावश्यक वस्तूंची सुमारे १५० किट्स सेवा संघात तयार करण्यात आली. त्यांचे योग्य पॅकिंग करून हे सर्व साहित्य पूरग्रस्त विभागांतील विविध ठिकाणी टेंपोद्वारे पाठवण्यात आले. सेवा संघाचे अनेक कार्यकर्ते व कर्मचारी वर्ग यांचे यामध्ये बहुमोल सहकार्य लाभले.

मागील दोन वर्षांप्रमाणेच यावर्षी देखील दिवाळीच्या सणादरम्यान 'किल्ले बांधणी २०२१'स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाला मुलुंडसोबतच भांडुप, ठाणे शहर ते थेट कोल्हापूर येथून देखील स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेकरिता 'ज्यूनिअर'गटासाठी ८ तर 'सिनीअर'गटासाठी १२ प्रवेशिका आल्या होत्या. या स्पर्धेचा एक भाग म्हणून सर्व सहभागी स्पर्धकांकरिता 'किल्ले बांधणी कार्यशाळा' दि. ३० ऑक्टोबर २०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. या द्वारे सर्व सहभागी स्पर्धकांना किल्ले माहिती व परीक्षणाबद्दल योग्य मार्गदर्शन करण्यात आले. दि.६ व ७ नोव्हेंबर रोजी स्पर्धकांनी तयार केलेल्या किल्ल्यांच्या जागी जाऊन या स्पर्धेचे परीक्षक श्री. माधव फडके आणि श्रीमती अपर्णा भट्टे यांनी परीक्षण केले. या स्पर्धेचा निकाल व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम दि.१२ नोव्हेंबर २१ रोजी संस्थेच्या सभागृहात घेण्यात आला. विजेत्यांना तत्कालीन अध्यक्ष श्री. चंद्रशेखर कुलकर्णी व गिरिमित्र विभागाचे उपाध्यक्ष श्री. रवी परांजपे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. या स्पर्धेतील सर्व सहभागींना विभागातर्फे उत्तेजनार्थ आकर्षक भेटवस्तू (मोबाईल पॉप सॉकेट) देण्यात आली. गिरिमित्र विभागाचे श्री. राहुल मेश्राम व कार्यकारिणीतील श्री.नितिन देशपांडे यांनी या सर्व उपक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.

किल्ले बांधणी स्पर्धा २०२१ चे निकाल पुढीलप्रमाणे आहेत.

**ज्यूनिअर गट :**

प्रथम क्रमांक : आम्ही मावळे ग्रुप, मुलुंड (पूर्व) सिंहगड किल्ला
द्वितीय क्रमांक : एन.एम फटाका किड्स, मुलुंड (पूर्व) - शिवनेरी किल्ला
तृतीय क्रमांक : राष्ट्रसारथी सोसायटी , मुलुंड (पूर्व) - रायगड किल्ला
उत्तेजनार्थ : सोहन पुजारी, ठाणे. काल्पनिक किल्ला



Ahval text2122N.indd 13 7/23/2022 8:35:21 AM

**सिनीअर गट :**

प्रथम क्रमांक : आजाद स्पोर्टस् क्लब, नाहूर (पूर्व) , पन्हाळगड
द्वितीय क्रमांक : बिनधास्त बॉईज, भांडुप (पूर्व) , लोहगड
तृतीय क्रमांक : शिवगर्जना ग्रुप , मुलुंड (पूर्व), सुवर्णदुर्ग
उत्तेजनार्थ : जयेश वैती , मुलुंड (पूर्व) , खांदेरी किल्ला
उत्तेजनार्थ : श्रीराज निरुखे व विक्रांत पाटील, कोल्हापूर , राजगड

श्री. रवींद्र लाड यांनी लिहिलेले परंतु काही कारणाने अप्रकाशित राहिलेले 'बखर घारापुरीची' हे पुस्तक त्यांचे चिरंजीव श्री.आदित्य लाड यांनी पुढाकार घेऊन पूर्णत्वास नेले व दि. १६ जानेवारी २०२२ रोजी 'ग्रंथाली' या प्रकाशन संस्थेतर्फे त्याचा प्रकाशन सोहळा संस्थेच्या सभागृहात संपन्न झाला. गिरिमित्र कार्यकर्त्यांनी नेहमीप्रमाणे त्यास उत्तम प्रतिसाद दिला.

अहवाल वर्षात गिरिमित्र संमेलनाचे आयोजन शक्य आहे का व असल्यास आयोजनात काय काय बदल करावे लागतील या संदर्भात काही बैठका घेऊन चर्चा करण्यात आली. मात्र कोविड विषयक शासकीय मार्गदर्शक नियमावलीच्या मर्यादेत असा कार्यक्रम आयोजित करण्याची शक्यता धूसर दिसल्याने पुढील वर्षी (२०२२मध्ये) जोमाने गिरिमित्र संमेलनाचे आयोजन करावे असे ठरले.

अहवाल वर्षात कोविड१९ च्या कठीण काळातही विभागाचे सर्वच कार्यकर्ते एकमेकांच्या उत्तम संपर्कात होते व आपापल्या परीने समाज सेवेत हातभार लावत होते. यांमध्ये अध्यक्ष श्री.ऋषिकेश यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ॲडव्होकेट रवी परांजपे, सर्वश्री किरण देशमुख, राहुल मेश्राम, प्रसाद जोशी, रमेश कुलकर्णी व श्रीमती अपर्णा भट्टे या विभागाच्या सदस्यांसह इतरही संमेलन कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे होते.

## प्रेरणा पुरस्कार' व 'सॅल्यूट इंडिया'

SALUTE INDIA

समन्वयक - सतीश पाटणकर, नितीन देशपांडे

महाराष्ट्र सेवा संघातर्फे दिले जाणारे विविध पुरस्कार कोविड महामारीमुळे मोठ्या प्रमाणावर खंडित झाले. त्यांपैकी एक पुरस्कार म्हणजे 'सुधाकर अुद्धवराव आठले समाजोद्धारक पुरस्कार'. दुसऱ्या लाटेनंतर थोडी मोकळीक मिळाल्यावर हायब्रीड पद्धतीने ह्या पुरस्काराचा सोहळा करण्याचे ठरले २१ ऑगस्ट २०२१ ह्या दिवशी. नवीन प्रयोग करताना विघ्ने येतात तेव्हा त्यावर संघभावनेने मात करणे हीच कार्यकर्त्यांची खरी कसोटी असते. अडचणी पार करून एक सुंदर कार्यक्रम संपन्न झाला. पुरस्काराचे मानकरी होते चिथडे दांपत्य. ह्या आगळ्या वेगळ्या कुटुंबाने राष्ट्रीय भावनेने सैन्यदलासाठी जणू एक व्रतच घेतले आहे. सिर्फ (Soldiers Independent Rehabilitation Foundation, Pune) ह्या संस्थेतर्फे स्वकमाईतून गेली बावीस वर्षे हे कुटुंब सैन्यदलातील शहीदांच्या परिवारांसाठी कार्यरत आहे.

जगातील सर्वोच्च रणभूमी 'सियाचेन' येथे तैनात सैनिक बांधवांच्या श्वासासाठी 'ऑक्सिजन निर्मितीचे संयंत्र' उभारून त्यांनी सैन्याला अर्पित केले. कोट्यावधी रुपये खर्च असलेली ही यंत्रणा हिमालयाच्या इतरही भागांत आवश्यक आहे आणि त्यासाठी आर्थिक, तांत्रिक, औपचारिक अशा सर्व प्रकारच्या या खटपटी हे दांपत्य अथकपणे करत आहे. त्यांच्या या प्रयत्नांचा गौरव आणि आर्थिक पाठबळ देण्यासाठी खारीचा वाटा म्हणून सदर पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्या निमित्ताने त्यांचे फार प्रेरक असे सादरीकरण झाले. खासदार श्री.विनय सहस्रबुद्धे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान कार्यक्रम संपन्न झाला. साथीच्या भयाने प्रत्यक्ष उपस्थिती मर्यादित राहिली, मात्र ऑनलाईन पद्धतीनेही इच्छुकांनी कार्यक्रमाचा अनुभव घेतला. 'सॅल्यूट इंडिया'च्या मूलभूत संकल्पनेशी निगडित असल्यामुळे हा कार्यक्रम 'सॅल्यूट' च्या बॅनरखाली सादर झाला.

'सॅल्यूट इंडिया' ने नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात एक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे शीर्षक होते 'अफगाणिस्तानची समस्या आणि भारत - एक दृष्टिकोन'. तालिबानने अफगाणिस्तान काबीज केल्यानंतर भारताची राजकीय तसेच संरक्षणविषयक भूमिका काय असू शकते यावर तज्ज्ञांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमासाठी वक्ते होते १) ज्यांचा आंतरराष्ट्रीय घटनांचा राजकारणाच्या अनुषंगाने अभ्यास आहे असे तज्ज्ञ श्री.दिवाकर देशपांडे. २) संरक्षण विषयातील तज्ज्ञ विंग कमांडर (निवृत्त) शशिकांत कोप्पीकर.

संस्थेच्या छोट्या सभागृहाचा स्टुडिओ प्रमाणे उपयोग करून सदर कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने प्रसारित करण्यात आला. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक होता. मात्र कुठलीही बाह्य मदत न घेता, कार्यकर्त्यांची जिगर या एकमेव भांडवलावर सदर कार्यक्रम उत्तमरीत्या संपन्न झाला.

तालिबानने ताब्यात घेण्यापूर्वी अफगाणिस्तानच्या राष्ट्रबांधणीमध्ये असलेल्या भारताच्या योगदानाबद्दल श्री.देशपांडे यांनी प्रथम माहिती दिली. अमेरिकेने शीतयुद्ध काळापासून लोकशाही वसवण्याच्या नावाखाली अफगाणिस्तानमध्ये लुडबूड केली आणि शेवटी दहशतवाद तसाच राहू देऊन समस्येचे निराकरण न करता तिथून पाय काढून घेतला. ह्या उलट भारताची भूमिका, आणि विशेषतः शेजारी देशांबद्दल, कायमच समन्वय आणि सौहार्द ह्यावर आधारलेली आहे. अनेक गुंतागुंतीच्या कारणांमुळे भारताला तिथे थेट काही करता येण्याची शक्यता नाही आणि भारताची सॉफ्ट पॉवर सद्य परिस्थितीमध्ये तिथे किती परिणामकारक ठरू शकते हे काळच ठरवेल. मात्र दुसरीकडे चीनचा अफगाणिस्तानातील उत्कृष्ट प्रकारच्या खनिज साठ्यांवर डोळा असल्यामुळे, तसेच त्यांना अफगाणिस्तानला आपल्या कर्जाच्या सापळ्यात ओढून घ्यायचे असल्यामुळे चीन अफगाणिस्तानच्या पुनर्विकासामध्ये काही न काही कामगिरी नक्कीच बजावेल आणि हेच उद्दिष्ट ठेवून नवनिर्मित तालिबान सरकारला मान्यता देणारा चीन हा पहिलाच देश होता. ह्या सर्व पार्श्वभूमीवर भारताच्या भूमिकेकडे अनेक बड्या राष्ट्रांचेही अपेक्षापूर्ण लक्ष आहे. भारताला सध्या तरी राजनैतिक पद्धतीनेच ह्या समस्येच्या समाधानासाठी प्रयत्न करावे लागतील असे ह्यातून स्पष्ट झाले.

दोन्ही वक्त्यांचा त्यांच्या स्वतःच्या प्रांतातील अभ्यास श्रोत्यांना ह्या महत्त्वाच्या विषयावर उत्तम प्रबोधन करून गेला. 'सॅल्यूट इंडिया' चा मुख्य उद्देश हा देशासाठी महत्त्वाच्या असलेल्या विविध विषयांवर लोकांना योग्य माहितीच्या आधारे योग्य दृष्टी देणे हा आहे आणि त्या अनुषंगाने असे कार्यक्रम परिणामकारक ठरतात.

समन्वयक - सतीश पाटणकर, नितीन देशपांडे



## अर्थ विभाग

**चंद्रशेखर वझे (अध्यक्ष) विजय वझे ( कार्यवाह)**

**सदस्य : प्रकाश सडेकर, अमिता ठोसर,तृप्ती राणे, वैदेही फडणीस, श्रेया देशपांडे, अरुण भंडारे, विजय वैद्य, विनय देसाई, विवेक दांडेकर, नितीन ढवळीकर, विनोद सौदागर, उल्हास हंबर्डे, विजय जोशी, संजीव गोखले, सुरेंद्र तारे, अवधूत गोळे**

**२०२१-२२ वर्ष कोविड महामारीच्या भीतीतच गेले. कोणी कोणाला भेटत नव्हते. पण अश्याही परिस्थितीत अर्थ विभागाने अर्थ प्रबोधन व्याख्यानमाला आभासी (ऑनलाईन) पद्धतीने दर महिन्याला अगदी जोरात घेतली. सर्व कार्यक्रम 'झूम'वर झाले आणि या सगळ्या कार्यक्रमांना श्रोत्यांनी चांगला प्रतिसाद दिला. शासनाने मार्च २०२२ पासून कोविड१९ च्या नियमांमध्ये शिथिलता आणली. त्यामुळे मार्च २०२२ महिन्याचा कार्यक्रम प्रत्यक्ष घेतला आणि या कार्यक्रमाला १००हून अधिक श्रोत्यांनी हजेरी लावली.**

**ह्या वर्षामध्ये खालील कार्यक्रम सादर झाले.**

| अनु.क्र | दिनांक | विषय | वक्ता | पुष्प |
|---|---|---|---|---|
| १ | २४.०४.२०२१ | स्थावर मालमत्ता -कायदेशीर बाबींची तोंडओळख, भाग १ | ॲड. मनीषा अभ्यंकर-हुपरीकर | ७४ |
| २ | ३०.०५.२०२१ | स्थावर मालमत्ता -कायदेशीर बाबींची तोंडओळख, भाग २ | ॲड. मनीषा अभ्यंकर-हुपरीकर | ७५ |
| ३ | २६.०६.२०२१ | गुंतवणुकीवर नफा-तोटा झालाय? भांडवली नफ्यावरचे आयकरातील खाच खळगे माहीत आहेत ना? | सी.ए.संजीव गोखले | ७६ |
| ४ | २५.०७.२०२१ | स्थावर मालमत्तेवरील भांडवली नफा आणि प्राप्तिकर कायदा | सी.ए.चंद्रशेखर वझे | ७७ |



Ahval text2122N.indd 15 7/23/2022 8:35:21 AM

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | २८.०८.२०२१ | शेअर मार्केटचे भवितव्य काय ? | सौरभ गुप्ता | ७८ |
| ६ | २६.०९.२०२१ | इमारतींच्या पुनर्विकासाची वाटचाल करताना | ॲड. मनीषा अभ्यंकर-हुपरीकर | ७९ |
| ७ | २४.१०.२०२१ | साठ हजारी शेअर बाजार | चंद्रशेखर टिळक | ८० |
| ८ | ०५.१२.२०२१ | वार्षिक विवरणपत्र भरताना कोणती काळजी घ्याल. | सी.ए.संजीव गोखले | ८१ |
| ९ | १६.०१.२०२२ | भारतीय अर्थव्यवस्थेत रिझर्व बँकेची भूमिका - धोरण, धाव व धाक | दत्ता काळे | ८२ |
| १० | ०४.०२.२०२२ | केंद्रीय अर्थसंकल्प २०२२- अर्थ व्यवस्थेला बूस्टर मिळणार का ? | सी.ए.संजाव गोखले, डॉ.अभिजित फडणीस | ८३ |
| ११ | २५.०३.२०२२ | सद्य:स्थितीतल्या गुंतवणुकीच्या संधी | चंद्रशेखर टिळक | ८४ |

विजय वझे , कार्यवाह

चंद्रशेखर वझे, अध्यक्ष

**गणेश केशव करंदीकर उद्योजकता पुरस्कार मानकरी**

| | |
|---|---|
| २०१४ | किरण देशमुख, नंदकिशोर नेमाडे, हेमंत रणदिवे |
| २०१५ | सुजाता परांजपे -भाग्यश्री प्रभुघाटे, दिलिप यादव, प्रशांत सकपाळ |
| २०१६ | दिपक जाधव, हेमंत भिडे, पूर्णिमा ओक |
| २०१७ | सुधीर हणमंते, आनंद आपटे, केतन मुसळे-देवयानी मुसळे |
| २०१८ | प्रसाद भिडे, प्राजक्ता पाटील-मकरंद पाटील, रोहन-प्रियाल नागरे |
| २०१९ | विकास पाथरकर, प्रतिभा व सुधीर पिळगावकर, विनायक ओक |



Ahval text2122N.indd 16 7/23/2022 8:35:21 AM

# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

अध्यक्ष - नंदिनी हंबर्डे, कार्यवाह - अरुण भंडारे

सभासद - सुषमा पाटणकर, विनोद सौदागर, सदाशिव पोतदार, मेधा देव, अनंत जोशी, अर्चना कामत

स्थापना - १ मे १९७९, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारप्राप्त 'अ'वर्ग ग्रंथालय

गेली जवळ जवळ २ वर्षे कोरोना या मायावी रूप बदलणाऱ्या विषाणूने आपल्याला स्थानबद्ध करून ठेवले होते. राहू काळाप्रमाणे याला कोरोना काळच म्हणायला हवे. स्थानबद्धतेमुळे एक अगतिकता समाजमनात आली होती. मानसिक संतुलन ढळते की काय अशीही परिस्थिती ज्येष्ठांची झाली होती. भय इथले संपत नाही असे वाटत असताना लशीची आणि बूस्टर डोसची कवचकुंडले नागरिकांना मिळाली आणि जनजीवन पूर्ववत व्हायला सुरुवात झाली. गुढीपाडव्यापासून सुरू झालेल्या मराठी हिंदू नवीन वर्षाने तर कोरोनाचा काळोख भेदला आहे.

कोरोनाच्या या साथीमध्येदेखील ग्रंथालयाने वाचकांची भूक शमविण्यासाठी ग्रंथालय प्रथम अंशतः आणि नंतर नियमित सुरू ठेवले. पहिल्या लाटेतही असेच प्रयत्न ग्रंथालयाने केले होते. २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रंथालयाने काही आभासी तर काही प्रत्यक्ष कार्यक्रमांचे आयोजन केले.

दि.२७ जून२०२१ : नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात संस्थेच्या 'आपुलकी' या षण्मासिकाच्या प्रकाशनाने झाली. ज्येष्ठ पत्रकार समीर कर्वे कार्यक्रमाला उपस्थित होते.

१९ जुलै २०२१ : 'स्टीव्ह आणि मी' पुस्तकाचा ऑनलाईन परिचय साऱ्याच प्राणीजगताशी विशेषतः मगरीशी मैत्र जुळवणारा प्राणीमित्र स्टीव्ह आयर्विनच्या आठवणी त्याची पत्नी टेरी आयर्विनने वरील पुस्तकात शब्दबद्ध केल्या आहेत. या इंग्रजी पुस्तकाचा मराठीत समर्थ अनुवाद सोनिया सदाकाळ काळोखे यांनी केला आहे. आपल्या या अनुवादामागची भूमिका सोनिया यांनी आभासी माध्यमातून करून दिली. कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

२० जुलै २०२१ : ग्रंथालय व संस्थेच्या मैत्रेयी विभागाने 'मला काय वाटते' लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष. स्पर्धेला उदंड यश लाभले. या स्पर्धेचा विस्तृत वृत्तांत , मिळालेले प्रायोजकत्व इत्यादीचा तपशील 'मैत्रेयी' च्या अहवालात दिले आहे.

२३ जुलै २०२१ : व्यास पौर्णिमेनिमित्त मुलुंडस्थित गोपुजकर दांपत्याने भेट दिलेल्या महर्षी व्यासांच्या सुबक मूर्तीची ग्रंथालयात प्रतिष्ठापना करण्यात आली. गोपुजकर पती-पत्नी समारंभाला उपस्थित होते.

१३ ऑक्टोबर २०२१ : प्रतिवर्षीप्रमाणे सरस्वती पूजनाचा कार्यक्रम ग्रंथालयात करण्यात आला. संस्थेचे कार्यवाह जयप्रकाश बर्वे तसेच संस्था आणि ग्रंथालय सदस्य कार्यक्रमाला उपस्थित होते.

१४ ऑक्टोबर २०२१ : सेतुमाधवराव पगडी स्मृती व्याख्यानमालेचे हे ९ वे वर्ष. कोरोना निर्बंध, टाळेबंदी यामुळे हे व्याख्यान आभासी माध्यमावर आयोजित केले होते. वक्ते निखिल बेल्लारीकर यांनी 'भारताबाहेरील भारतीय' (इ.स.पहिल्या शतकापासून) विषयावर, भारताबाहेर पसरलेल्या भारतीयांचा इतिहास कथन केला. आभासी माध्यम यामुळे प्रतिसाद थोडा कमी होता. बेल्लारीकर हे पुणे स्थित इतिहास अभ्यासक आहेत.

१६ ऑक्टोबर २०२१ : ग्रंथालीच्या सहकार्याने 'हमारी याद आएगी' या कुमार सोहोनी लिखित पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून पुरुषोत्तम बेर्डे, महेंद्र तेरेदेसाई आणि दीपक करंजीकर उपस्थित होते.

१९ नोव्हेंबर २०२१ : पॉप्युलर प्रकाशनाच्या सहकार्याने सारंगी आंबेकर लिखित 'संगीत सान्निध्य' आणि 'सुंबरान' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात नाट्यकर्मी सतीश आळेकर उपस्थित होते. पॉप्युलर प्रकाशनाच्या रामदास भटकळ यांच्या सारंगी आंबेकर शिष्या. या निमित्ताने सारंगी यांच्या गझल गायनाचाही कार्यक्रम झाला.

२७ नोव्हेंबर २०२१ : ग्रंथालीच्या सहकार्याने कवी मोहन काळे यांच्या 'थेंबाने विणली नक्षी' या ग्रंथालीच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता. हा दिवस आणि हा समारंभ संस्थेसाठी , कार्यकर्त्यांसाठी दु:खद दिवस ठरला. संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी व्यासपीठावरून बोलत असताना कोसळले आणि त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. एक उमदे अभ्यासू अध्यक्ष संस्थेने गमावले.

२३ जानेवारी २०२२ : संस्थेचे माजी अध्यक्ष, विश्वस्त श्री.सु.ना. पाटणकर यांच्या सौजन्याने प्रतिवर्षी 'साहित्य साधना' पुरस्काराचे आयोजन केले जाते. पुरस्काराचे हे सोळावे वर्ष. या वर्षी हा पुरस्कार म.टा.चे निवासी संपादक, साहित्यिक श्रीकांत बोजेवार यांच्या

'अगस्तीत्रयी'ला, जो तीन रहस्य कथांचा संच आहे, देण्यात आला. या तीन पुस्तकांची नावे आहेत. १) हरवलेलं दीड वर्ष, २) अंगठी १८२०, ३) न्यूड पेंटिंग. विस्मृतीत जात असलेल्या रहस्यकथा प्रकाराला बोजेवारांनी आपल्या लेखणीने संजीवनी दिली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक पत्रकार कुमार केतकर होते.

२६ मार्च २०२२ : वाचक मेळावा - कोरोनाच्या साथीमुळे ग्रंथालयापासून काही काळ दुरावलेल्या वाचकांचे ग्रंथालयाबरोबरचे नाते पुन्हा दृढ व्हावे या उद्देशाने एक वाचक मेळावा २६ मार्चला आयोजित केला होता. या मेळाव्याच्या अंतर्गत लेखन, पुस्तक परीक्षण, अभिवाचन, मनोगत - मला आवडलेला चित्रपट तसेच छोट्या वाचकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विजेत्यांना त्याच दिवशी पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली. ग्रंथालयाने कटाक्षाने सर्व विजेत्यांना पारितोषिके रोख रकमेत न देता पुस्तकरूपात प्रदान केली. तसेच स्पर्धेतील सर्व सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार डॉ.मुकुंद कुळे उपस्थित होते.

वाचक संवाद : हा ग्रंथालयाचा एक अभिनव उपक्रम. जे जे उत्तम आपण वाचले ते इतरांना आपण सांगावे अशी रसिक वाचकांची इच्छा. ती पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाने हा उपक्रम सुरू केला. दर सोमवारी वाचक सेवा संघात येत आणि आवडलेले पुस्तक , वृत्तपत्रीय लिखाण यावर आपली मते प्रकट करीत. कोरोना आणि टाळेबंदीमुळे हा उपक्रम बंद होतो की काय असे वाटत असताना आम्ही 'ऑनलाईन'माध्यमातून हा उपक्रम सुरू केला. गेली दोन वर्षे वाचकांचा उत्तम प्रतिसाद याला मिळाला. आता निर्बंध दूर झाले. कोरोनाचे सावट संपले त्यामुळे पुन्हा प्रत्यक्ष वाचक संवाद सुरू झाले आहेत. प्रतिसादही चांगला मिळत आहे.

अहवाल वर्षात महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त, कार्यकारी मंडळ सभासद, ग्रंथालय आणि कार्यालयीन कर्मचारी आणि आमच्या वाचकांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

| | |
|---|---|
| अरुण भंडारे<br>कार्यवाह | नंदिनी हंबर्डे<br>अध्यक्ष |

## ज्ञानेश्वर पुस्तक पेढी अहवाल-२०२१/२०२२

**कोरोना साथीमुळे अहवालवर्षी सर्व शाळा बंद असल्याने ज्ञानेश्वर पुस्तक पेढीतून विद्यार्थ्यांनी पुस्तके नेली नाहीत.**

**उमेश काणेकर-सेवक** **श्रीमती श्रद्धा गोविलकर (ग्रंथपाल)**



Ahval text2122N.indd 18 7/23/2022 8:35:21 AM

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| १८३ | ७१ | २५४ |

३१-३-२०२२ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३७,४८०

अहवाल वर्षात ४८,८६० /- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

### ग्रंथालय सभासद तपशील

**३१-३-२०२२ अखेर सभासद**

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | ग्रंथ विभाग-सिटी ऑफ जॉय | |
|---|---|---|---|---|
| १३६ | १०५ | ६०९ | ३३ | |
| अंक विभाग | सन्माननीय सदस्य | सिटी ऑफ जॉय -बाल | ग्रंथ अधिक मासिक | एकूण सदस्य |
| १४२ | २ | ३ | १७ | **१०४७** |

### ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ३० | ८ | १ | ५ | ४४ |
| हिंदी | ६ | - | २ | - | ८ |
| इंग्रजी | ८ | - | १३ | ११ | ३२ |
| एकूण | ४४ | ८ | १६ | १६ | ८४ |

### दिवाळी अंक योजना २०२१-२०२२

| | |
|---|---|
| सभासद संख्या | १०५ |
| अंकाचे प्रकार | ५७ |
| अंकांच्या एकूण प्रती | १३८ |
| खरेदी किंमत रुपये | २४,११५/- |

### मोफत वाचनालय - वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | ३ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत |
| इंग्रजी | २ | टाईम्स ऑफ इंडिया, इकॉनॉमिक टाईम्स |



Ahval text2122N.indd 19 7/23/2022 8:35:21 AM

# दृष्टिसेवा अभ्यासिका

**अध्यक्ष - सुनीता देवधर, कार्यवाह - रश्मी अनगळ, कोषाध्यक्ष - नंदिनी हंबर्डे**

**सभासद - प्रियांका मोकाशी, विनोद सौदागर, श्री. सदाशिव पोतदार, श्री. द.व. कुलकर्णी**

कोरोनाचा फेलाव, सरकारी निर्बंध यांमुळे 'दृष्टिसेवे'च्या विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या, लेखनिक उपलब्ध नसणे या गोष्टी विचारात घेऊन गेल्या वर्षी दृष्टिसेवेच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेला बसवता आले नाही. मात्र शिक्षकांनी त्यांचे 'ऑनलाईन' वर्ग घेऊन त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. यंदाच्या वर्षी त्यांची उजळणी व नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना 'ऑनलाईन' शिकवण्यात आले.

कोरोनाचे निर्बंध शिथिल झाल्यावर ७ डिसेंबर २०२१ रोजी प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्यात आले परंतु कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या धोक्यामुळे ते महिन्याभरातच बंद करावे लागले.

यंदाची शालांत परीक्षा १६ मार्च २०२२ रोजी सुरू झाली. परीक्षा महामंडळाने जारी केलेल्या नव्या नियमांमुळे दृष्टिसेवेच्या कार्यकर्त्यांना शेवटपर्यंत धावपळ करावी लागली. मुलुंडमध्ये परीक्षा न होता, यंदा विद्यार्थ्यांना भांडुप व घाटकोपर या दोन केंद्रांवर परीक्षेसाठी पोहोचवावे लागले. ऐनवेळी लेखनिकांनी माघार घेतल्यावर परीक्षेच्या आदल्या दिवशी नवे लेखनिक मिळवून परीक्षा केंद्रावर ने-आण करण्याची व्यवस्था करावी लागली. त्यासाठी धावून आलेल्या सर्वांची दृष्टिसेवा ऋणी आहे.

२० जून पर्यंत आपल्या विद्यार्थ्यांचा निकाल लागला. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही घवघवीत म्हणजे १००टक्के यश मिळाले आहे.

रश्मी अनगळ, कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष

---

# विज्ञान विभाग (विज्ञान प्रेमींचा मंच)

अध्यक्ष : सतीश पाटणकर, कार्यवाह : नितीन देशपांडे, विशेष सहभाग : गुरूप्रसाद कार्लेकर, विद्याधर जोशी
तरूण सदस्य : वैभव बुद्धदेव, चिन्मय देशमुख, अथर्व जोशी, जयश्री सोनावणे, वरदा नवाथे, रत्नेश गवळी, मृणाल थोरात, चिन्मयी वझे, जाई कुलकर्णी, सचिन वझे, अर्चित गोखले, अनिरुद्ध शेवळे, आदित पाटणकर

**विज्ञान**

शालेय मुलांमध्ये विज्ञानाची गोडी लावणे, वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आणि विज्ञानाचा प्रसार करणे हे विज्ञान विभागाचे स्थापनेपासूनचे उद्दिष्ट आहे. मागील अहवाल वर्षात कोविड१९ या रोगाच्या साथीचा अचानक आणि सर्वदूर झालेला प्रसार आणि त्यातून निर्माण झालेली अभूतपूर्व अशी जागतिक परिस्थिती ह्यामुळे शाळा बंदच राहिल्या. विज्ञान विभागाने ह्या बदलत्या परिस्थितीत आवश्यक असलेले तंत्रज्ञान अवगत करून 'ऑनलाईन' पद्धतीने विविध विषयांवर उत्तमोत्तम कार्यक्रम आयोजित केले व इतर विभागांनाही अशा पद्धतीने कार्यक्रम आयोजित करण्यास सर्वतोपरी साहाय्य केले. मात्र अहवाल वर्ष जवळ जवळ संपूर्णपणे संभ्रमित अवस्थेत आणि दोलायमान राहिल्यामुळे(विशेषतः शालेय मुलांकरता) आणि ऑनलाईन प्रकाराचे एक प्रकारे अजीर्ण झाल्यामुळे 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' सारखा महत्त्वाचा कार्यक्रम देखील ठरवता ठरवता रद्द करावा लागला. तसेच युवा कार्यकर्ता वर्ग हळूहळू आपापल्या वैयक्तिक करियरमध्ये व्यग्र होत गेल्यामुळे आणि नवीन कार्यकर्त्यांची पुढील फळी अजून उभी न राहिल्यामुळे विज्ञान विभाग एकूणच थंडावला आहे.

युवा कार्यकर्ते, शालेय विद्यार्थी आणि शालेय विज्ञान शिक्षक हे विज्ञान विभागाचे तीन मुख्य स्तंभ. मात्र ह्या सर्वांनाच वेगवेगळ्या अर्थाने बदलणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेणे आव्हानात्मक असणार आहे. त्यामुळे विभागाची ह्यापुढील वाटचाल अनिश्चिततेच्या वळणावर आहे.

नितीन देशपांडे , कार्यवाह — सतीश पाटणकर, अध्यक्ष



Ahval text2122N.indd 20 7/23/2022 8:35:21 AM

# ऐरोली शाखा

अध्यक्ष - प्रदीप र. सप्रे , कार्यवाह - शंकर गो. वीरकर , कोषाध्यक्ष - किशोर म. पेंढरकर
**सदस्य :** चंद्रशेखर म. कुलकर्णी (दि.२७नोव्हेंबर २०२१पर्यंत), त्यानंतर श्री. विनोद म.सौदागर (पदसिद्ध), जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) मु. शं. बालंखे , विजय जगताप, माधवी देशमुख, आरती सप्रे, अनिल कुन्हेकर, पंकज पाठक, नवीन कुलकर्णी, मनोहर कोशे

नमस्कार !
मित्रहो,
